"Techno - Social Excellence"
Marathwada Mitramandal's
Institute of Technology (MMIT)
Accredited with "A" Grade by NAAC
Survey No. 35, Vadgaon Shinde Road, Lohgaon, Pune - 411 047
Approved by AICTE, New Delhi, Recognised by DTE, M.S.Mumbai, Affiliated to Savitribai Phule Pune University
Email : principal@mmit.edu.in Website : www.mmit.edu.in
Tel No. : +91 7447786623 / +91 7447786624 DTE Institute Code : 6203

**NEWS PAPER CLIPPING SERVICE**

Name of the Newspaper: - Sakal | Page no.4 | Date: 13/02/2020

सकाळ

# मराठवाडा मंडळाचे श्रमसंस्कार शिबिर

विश्रांतवाडी, ता. १२ : लोहगाव येथील मराठवाडा मित्र मंडळ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दोनदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिर शिरूर तालुक्यातील वढू बुद्रुक येथे विविध उपक्रमांनी पार पडले.

याप्रसंगी सरपंच रेखा शिवले, उपसरपंच रमेश शिवले, माजी उपसरपंच संतोष शिवले, महादेव भंडारे, साहेबराव शिवले, प्राचार्य डॉ. रूपेश भोरटके, प्रा. एकनाथ कुन्हे, प्रा. रोहित पोलास, प्रा. गणेश जगदाळे, प्रा. प्रांजली देशमुख, किशोर काळे आदी उपस्थित होते.

शिबिराची सुरवात व्यसनमुक्ती या विषयावर पथनाट्य सादर करून झाली. वढू बुद्रुक परिसरात विविध ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. शिबिरांतर्गत लहान मुलांचे, महिलांचे खेळ, होम मिनिस्टर, कीर्तन तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. ग्रामस्थांच्या निवासस्थानी जाऊन मतदानाचे महत्त्व, शासनाच्या विविध योजना, प्लॅस्टिकमुक्ती या विविध विषयांवर जनजागृतीच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराचा समारोप शरदचंद्रजी पवार माध्यमिक शाळेत वृक्षारोपण करून झाला.



वढू बुद्रूक : श्रमसंस्कार शिबिरात सहभागी झालेले मराठवाडा मित्र मंडळ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे विद्यार्थी.

Pune, HadapsarToday
13/02/2020 Page No. 4

**Librarian**